. ग्रं. सं. ठाणें
काव्य
८४१.
५७१९२३

ॐ

…वो भव.'

…श्रीकसबागणपती]

पुष्प ४ थें शके १८४५



नमस्ते जगतकारणा आदिशक्ते । नमस्ते प्रभो क्षेमदात्रे नमस्ते ॥
जसे ध्वांत सूर्यागमीं नाशपावे ।तसें त्वत्कृपें पाप माझें जळावें ॥

…काशकः—विश्वनाथ पंढरीनाथ भोपळे कसबा घ. नं. १२०१

किंमत एक आणा.

REFBK-0002339
REFBK-0002339

REFBK-0002339

REFBK-0002339

## ईशस्तवन पद १ लें.

( बिंबाधरा मधुरा )

मयुरेश्वरा भूवरा मंगल विभवी विघ्नहरा
शिवकुमरा विजयीवरा दर्शन पावन शुभंकरा ।धृ.।

## पद्य २ रें. ( सोड माझा हात. )

मन मोहना होई तूं तारक अज्ञ जना
उद्धर हिंदजना ।धृ.।
स्मृतिपट लेखी समर्थ शिवस्मृति रंजवो करुणाघना
उदय चलावर स्वराज्यतारा ललकारत प्रभा जना ।१।

## पद्य ३ रें. ( प्रेमललना )

काल कठिणता भासवी नयना
अरि कपटानल पोळवी जन मन शांत न तन धन
सुचवी अशुभ दिन
सहन हाल करी वीर जननी मी वीर पुत्र पौत्रादि असुनी
खंति न किमपि आज मम मना ।१।

## पद्य ४ थें ( शाम खेले होरी )

शपथ घ्याच आतां समरांगणी
तुडविति इभ्रत मान खंडना, विटत कल्पना बढतीची ।
वीर लालाजी नेहरु – दास प्रभृतीची

# अर्पण पत्रिका

ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।

हिंद मेळ्याचा आज जो सार्वत्रिक गौरव होत आहे, सर्व श्रेय कवि राय यांच्या प्रतिभाशाली पद्यरचनेस आहे. ते आमचे मित्र श्री. सीतारामपंत कुलकर्णी यांना त्यांचेकडून होत असलेल्या प्रशंसनीय मदतीबद्दल हे पुष्प अर्पण करीत आहे.

वि० पं० भोपळे


## पूर्ण स्वदेशी पूर्ण स्वदेशी

# युनिव्हर्सलसोप कंपनीचे

आंगालालावण्याचे बारसोप कोणत्याही कंपनीच्या तोडीचे निघूं लागले आहेत. प्रत्यक्ष एक वेळ अनुभव घ्या भरपूर कमिशन व माफक दर,

आमचा पत्ताः—युनिव्हर्सल सोप कंपनी पुणें.


हें पुस्तक गोपाळ चिंतामण अनगळ यांनीं पुणें पेठ बुधवार घ. नं. ५२४ येथें छापिलें.

नाश... रवशता उकला साक्ष [ माय ]भवानीची ।१।

**पद्य ५ वें. ( कुइ आवो भुलावो )**

मधुबोला बुलबुला ही भूल भुलवी दुनियेला
हा पेशा पोशाखीचा नवथाट नव युवतीचा
मद चढे लोकसत्तेचा ना थांग ब्रीद वाचेचा
लया गेली रसवाणी मधुबोली । १ ।
ही देखे दुनिया झुकती–झुलविता कपट लढवीती
आमिषें सावजा धरिती—अवमानुनी फसगत करिती
कैवारी भयवारी डोंबारी । २ ।
हा अगडोंब देशाचा–भडकला मत्सराग्नीचा
वाढला कलह वैराचा–हा कोलाहल जनतेचा
मन रंगेल झाली चंगल उठवी दंगल । ३ ।
ही भूल भुलवण फसवी–परवथांचा चष्मा चढवी
स्वकीय भलेपण खचवी बंडाचा तोरा करवी
झाली हुरहुर मन भेसूर धावतसे सैरावैरा ॥ ४ ॥
हा नजरबंदीचा खेळ खेळलो बहुत दिन सकळ
वणव्याचा भयंकर लोळ उठवितसे हल कल्लोळ
अंधारी ठेचाळी जगजाळी । ५ ।

**पद्य ६ वें ( कैवारी प्रभु आमुचा )**

हा माय भूमिचा प्राण । हिंद जननीचा
राष्ट्रीय झेंडा फडकत राही । सुदिन सोनियाचा

२३८

स्वराज्य सत्ता प्रस्थापित हा । जोम राष्ट्राचा
उज्वल भक्ति भरत भूमिची । कौल जीविताचा
पुण्यश्लोक बलवंत महात्मा । चांद भारतीचा
अभय अचुक जो स्वधर्म दावी । संवगडी मोक्षाचा
अरि हृदयाचा थरकाप करी । महाभाग आमुचा
शिव पुण्याई सफल होईल । निश्चय जनतेचा
स्कंधी वाहू एकदिलानें । मोद बहारीचा
निशाण रोवूं पुण्यप्रतापी । उदय स्वराज्याचा

## पद ७ वें. ( श्रीमंत पतीची राणी )

फडकवा हिंद जननीचा अभिमान राष्ट्र झेंड्याचा
घ्या निशाण उभारुनि बाह्या कां फुका जन्म हा वाया
हें राष्ट्र आर्य पुत्रांचे घ्या सत्य करुनी साचें
अहो तुकवा मानाखालीं ह्या माय निशाणाखालीं
घ्या विजय दिव्य शौर्यानीं
तुडविला जात असतांना ( अहो ) रणशूर ! ग्लानी उतराना। १ ।
हा कलिजा महाराष्ट्राचा बलवंत लोकमान्यांचा
हा आत्मा शिवरायाचा खचित हो माय भूमिचा
जरिपटका बावटा भगवा संताजी धनाजी आठवा
हें पुण्य महात्माजींचें बलिदान देशभक्तांचें
हें आशिर्वचन राष्ट्राचें
प्रभु करी प्राण धैर्यानें प्रगटवा विजय शौर्यानें

## पद ८ वें. ( गझल )

सफलता हीच जन्माची करावी हिंद भू सेवा । धृ ।
म्हणवितां माय जननी जी हरविली आज परक्यांनीं
नागली जात असताना कशि हो धुंद उतरांना । १ ।
लोपले वीर्य वीरांचें दिवस ना आज धंद्यांचें
ओढले दैव देशाचे बुडाले कारागिर आमुचे । २ ।
मिजासा थोर मिराशीची बुडतसे मुळशी हो हातची
उडाला हक्क जनतेचा भरवसा आंग्ल न्यायाचा । ३ ।
दिवंगत धैर्य मेरु आमुचे कलिजे शिव तान्हाजीचे
साहती हाल आपदाना धन्य ते मर्द आठवाना । ४ ।
जमला जमाव भुरट्याचा बुरखा खाशा रावाचा
जाहला सुकाळ फटक्यांचा छल बघा देशभक्तांचा । ५ ।
कुठे हो आमुचे धंदे ठरलो अकलेचे खंदे
भरेना पोट बंधूंचें जिणें हें पूर्ण वांझेचें । ६ ।
भरला मायावी बाजार मिळेना अन्न पुढे अंधार
पडली भुरळ सगळ्यांना घालिति पिशाच्च धिंगाणा ।। ७ ।।
येतसे कीव गरिबीची आठव घ्या आर्यपुत्रांचा
म्हणविता पुत्र केसरिचे वसतसे दैन्य मैंदाचें ।। ८ ।।
बुजाली ओळख शाहण्यांची मातीमोल डिग्री हो आजची
हाती नसे आज सत्ता म्हणुनी मिळती अशा लाथा ।। ९ ।
जाडी विद्वता मोठी परि बसे ही लाठी पाठी
फिरतसे आज वरंवटा पुढे गत काय भगवंता ।। १

संत-काव्य ६८६

**पद ९ वें** ( वाजिदरे बाळा )

समर्थ शिवराया विनवाया आठव होई सदया ।। ध्रु ।।
तुझ्या साम्राज्यीं जे वसती कोण हलाखी त्यांची।
निद्रित महाराष्ट्रीं कल्लोळ करिती जंबुक सकळ
स्वकीय परकीय भावना समज उमज ना कोणा
कलहानल वारी केसरी परवशता मदउतरी
इज्जत मानाची प्राणाची प्रियकर महाराष्ट्राची
मर्द मराठ्यांची रणनीति धर्मग्लानी पळवीता
प्रियकर दौलतीचा महाराष्ट्र झाला आपदग्रस्त
जहरीचा प्याला लावियला जबरीनें ओंठाला
असहायी खचलो धुंदगती दुर्गतीची साक्षी
ना नेता आम्हा मंदमती कालाची ही महती
पुण्य प्रभावानें प्रस्थापी स्वराज्य स्वातंत्र्याचें
अनाथ वाली प्रभू दिगंती सुविक्रमें जन हालवी
कुलदीपक शिवबा अवतरशी तरिच दुनिया तरती

**पद १० वें.** ( सबसे रामभजन कर लेना )

घ्या ध्येय राष्ट्रकार्याचें श्रीशिवराया वंदुनिया । धु ।
दास्य कर्दमीं देश बुडाला धैर्य शौर्य आजि मावळलें
स्वातंत्र्याची भाक मागणें ही प्रभु चरणीं विनती । १ ।
महाराष्ट्र ही माय आपुली बटकी फिरंग्याची झाली
लाज वाटते सांगायाला कम नशिबाची बोली ।। २ ।।
अरि कपटानें मात केली छिद्रान्वेषण योजुनिया

REFBK-0002339

REFBK-0002339

मनोभूमिका तुडवत खेचित शिरत घरीं अरि माया ॥ ३ ॥
कठिण काल जरी प्राप्त होय तरी ऐक्य धैर्य ना सोडावें
शिव पुण्याई उपाय सुचवी जनता उद्धाराया ॥ ४ ॥
समर धुरंधर राष्ट्रवीर हे हाल आपदा सहताना
लक्ष्य साधिति स्वातंत्र्याचें स्वराज्य साधन करण्या ॥ ५ ॥
मतामतांचा उडे गलबला पदरीं येतो मूढपणा
हूडपणानें तरंग उडविती कर्तव्यीं फोलपणा ॥ ६ ॥
राष्ट्रवंद्य जो जनता नेता खचित प्राण तो जननीचा
सालंकृत हो मायभूमिला निश्चय हा जनतेचा ॥ ७ ॥

## पद्य ११ वें ( प्रेमभावें )

हिंदसेवा पुनित जीवित सार्थक सुफला शुभ विजया
भारतीं जन्मणें पूर्व पुण्याईचे सार्थक नर जन्माचें
दहते सतत चिन्ता सजिवता असुनियां माय छल निरसाना ॥ १ ॥

## पद १२ वें ( [illegible] होइना. )

विरह साहिना । क्षणहि [illegible] जाइना। धृ ।
लोकमान्य बळवंता । झुरत भारत सदा तुला
माय आस जाय लया । ( हिंद ) लाल हरपला ॥ १ ॥

## पद १३ वें चाल— ( शंभो शिवहर )

होवो शुभकर उत्सव प्रियकर जगदीशा
कर्तवीं रमवी सुमती होवो पावन भारत
निशिदिन उज्वल सुखकर ॥ १ ॥

२३३०